गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १९ वा ● सोमवार ०५ जून २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 19 | Date : 05/06/2023 | blow :Manday | Page 4 | Price 4


## ओडिशा रेल्वे अपघाताची सीबीआय चौकशी होणार

### रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची घोषणा




नवी दिल्ली : ओडिशाच्या बालासोरमध्ये एक्स्प्रेस ट्रेनला झालेल्या अपघातामुळे संपूर्ण देशात शोककळा पसरली आहे. भारतीय रेल्वेच्या इतिहासातील हा सर्वात मोठा अपघात असल्याचे बोलले जात आहे. या अपघातात आतापर्यंत २५० हून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. याशिवाय १,१०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. मदत आणि बचाव कार्य पूर्ण झाले आहे, मात्र अजूनही बोगींमध्ये मृतदेह अडकले असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषद घेतली. रेल्वे अपघाताच्या प्रकरणाची चौकशी आधीच सुरू आहे, मात्र आता सीबीआय चौकशीही केली जाईल आणि जो दोषी असेल त्याला शिक्षा करण्यास सरकार मागेपुढे पाहणार नाही, असे केंद्रीय रेल्वे मंत्र्यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घटनास्थळी जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच त्यांनी रुग्णालयात जाऊन जखमी रुग्णांची भेट देखील घेतली. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना पंतप्रधानांनी देखील या घटनेसंदर्भात दु:ख व्यक्त केलं. रेल्वे अपघाताची चौकशी करुन दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात येणार, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. तसेच त्यांनी ओडिशाच्या नागरिकांचे देखील यावेळी आभार मानले. बचावकार्यासाठी रेल्वेकडून युध्दपातळीवर करण्यात आल्याचं पंतप्रधानांनी यावेळी म्हटलं. 'ही घटना अनेक । पान २ वर

## महाराष्ट्र फाटकमुक्त करण्यासाठी राज्यात विशेष मोहीम : मुख्यमंत्री

### महाराष्ट्रातील ९ रेल्वे उड्डाणपुलांचे लोकार्पण आणि ११ उड्डाणपूल, भुयारी मार्गांचे भूमिपूजन




पुणे : केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते 'महारेल'तर्फे महाराष्ट्रात उभारण्यात आलेल्या ४४० कोटी रुपयांच्या ९ रेल्वे उड्डाणपुलांचे लोकार्पण आणि नियोजित ७०० कोटी रुपयांच्या ११ उड्डाणपूल तसेच भुयारी मार्गांचे भूमिपूजन करण्यात आले. महाराष्ट्र फाटकमुक्त करण्यासाठी राज्यात विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून गतीने ही कामे पूर्ण करण्यात येतील, अशी ग्वाही यावेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी दिली.

शिवाजीनगर येथील पोलीस मैदानावर झालेल्या या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री श्री. गडकरी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार श्रीरंग बारणे, आमदार सुनिल कांबळे, महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेश कुमार जायसवाल, पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, पोलीस आयुक्त रितेश कुमार, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, राज्य आणि केंद्र एकत्र आल्याने चांगली कामे उभी रहात आहेत. रेल्वे मार्ग ओलांडण्याच्या ठिकाणी फाटक नसले की नागरिकांच्या जीवाला धोका असतो. म्हणून असे प्रकल्प लवकर पूर्ण करून जनतेचा त्रास दूर करण्याचे प्रयत्न आहे. राज्यात रेल्वेसंबंधी प्रकल्प जलदगतीने पूर्ण व्हावेत म्हणून राज्य शासनाने महारेलची स्थापना केली. महारेलतर्फे वेगाने कामे करण्यात येत आहेत. राज्यात ९ उड्डाणपूलांचे लोकार्पण आणि ११ उड्डाणपूलांचे भूमिपूजन प्रथमच होत आहे. उड्डाणपूल आणि भुयारी मार्गाच्या कामांमुळे जनतेचा वेळ वाचणार आहे.

नागरिकांचा वेळ वाचावा आणि कार्यक्षमता वाढावी यासाठी पायाभूत सुविधांवर भर देण्यात येत आहे. देशात पायाभूत सुविधांची सर्वाधिक कामे महाराष्ट्रात सुरू आहेत. महाराष्ट्रात पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ क्षमता आहे, दळवळण सुविधा आहेत. नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात येत आहे. । पान २ वर


## अंदमानमध्ये रेंगाळलेला मान्सून आज केरळमध्ये धडकणार..!

### महाराष्ट्रात दहा जूनला पावसाचे आगमन

नागपूर : मान्सून सक्रिय झाला असून तो आज केरळमध्ये धडकण्याची शक्यता आहे. अंदामानमध्ये तो बराच काळ रेंगाळला होता. आता मात्र त्याने वेग पकडलाय. मान्सून नैऋत्येकडे वेगाने सरकत असल्याने आजच तो केरळच्या किनारपट्टीला धडक देऊ शकतो. भारतीय हवामान खात्याने चार जूनला मान्सून येईल, असा अंदाज दिला होता. तो अचूक ठरण्याची शक्यता आहे. सक्रीय झालेला मान्सून मालदीव समुद्रातून अरबी समुद्रात दाखल झाल्याचे हवामान खात्याने सांगितले आहे. मान्सून आज केरळात दाखल झाल्यास कर्नाटक आणि गोव्याच्या किनारपट्टीवर जोरदार पूर्वमान्सून सरी कोसळतील. महाराष्ट्रात दहा जूनला पावसाचे आगमन होण्याची शक्यता आहे. राज्यात सरासरीच्या ९५ टक्के पाऊस पडणार असल्याची शक्यता हवामान विभगाने वर्तविली आहे. राज्यात जून, जुलैमध्ये कमी पाऊस, तर ऑगस्ट महिन्यात साधारण पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.



## राज्य शैक्षणिक आराखडा निर्मितीसाठी ३२ सदस्यांची 'जम्बो' सुकाणू समिती



पुणे : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२२ नुसार पूर्वप्राथमिक शिक्षण, शालेय शिक्षण, शिक्षक शिक्षण आणि प्रौढ शिक्षण या घटकांचा आढावा घेऊन राज्याचा शैक्षणिक आराखडा तयार करण्यासाठी 'जम्बो' सुकाणू समिती नियुक्त करण्यात आली आहे. या समितीमध्ये एकूण ३२ सदस्यांचा समावेश आहे.शालेय शिक्षण विभागाने समिती स्थापनेबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. राज्यात सर्व विभागांच्या सहकार्याने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आली आहे. नव्या धोरणात पूर्वीची १०+२+३ ही रचना बदलून आता ५+३+३+४ अशी रचना करण्यात आली आहे. त्यानुसार केंद्र सरकारकडून राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर जाहीर करण्यात आला आहे. तसेच येत्या काळात शालेय शिक्षणासाठीचा अंतिम आराखडा, शिक्षक शिक्षण आणि प्रौढ शिक्षण आराखडाही प्रसिद्ध करण्यात येणार आहे.या पार्श्वभूमीवर राज्याच्या गरजा, स्थानिक परिस्थिती, जागतिक आव्हानांचा विचार करून राज्यासाठी भविष्यवेधी आराखड्याची निर्मिती करण्यासाठी स्वतंत्र सुकाणू समिती नियुक्त करण्यात आली. या समितीमध्ये ३२ सदस्यांचा समावेश आहे. समिती राज्य अभ्यासक्रम आराखडा पायाभूत शिक्षण, राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण, राज्य अभ्यासक्रम आराखडा शिक्षक शिक्षण, राज्य अभ्यासक्रम आराखडा प्रौढ शिक्षण तयार करणार आहे. तसेच पायाभूत स्तरापासून ते बारावीपर्यंतचा अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तक निर्मिती, ई साहित्य विकसन, मूल्यमापन प्रक्रिया सुसंगत होण्यासाठी समिती मार्गदर्शन करेल. राज्यअभ्यासक्रम आराखडा, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तक निर्मिती, ई साहित्य विकसन प्रत्येक टप्प्यावरील किमान सुरुवातीची मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण होऊन त्याला शासनाची मंजुरी मिळेपर्यंत समितीचा कार्यकाळ राहणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

## मणिपूर हिंसाचाराच्या चौकशीसाठी आयोगच;

### निवृत्त न्यायमूर्ती अजय लांबा अध्यक्ष

नवी दिल्ली : मणिपूरमध्ये अलीकडील काळात झालेल्या हिंसाचाराची चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारने रविवारी चौकशी आयोगाची स्थापना केली. गुवाहाटी उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती अजय लांबा या आयोगाचे प्रमुख असतील. या हिंसाचारात ८० जणांचा बळी गेला आहे.माजी सनदी अधिकारी हिमांशू शेखर दास आणि निवृत्त आयपीएस अधिकारी अलोका प्रभाकर हे या आयोगाचे अन्य सदस्य आहेत.याबाबत केंद्रीय गृह विभागाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, ३ मे रोजी आणि नंतर मणिपूरमध्ये विविध सामाजिक गटांत झालेल्या हिंसाचाराची, तसेच हा हिंसाचार का पसरत गेला, याची कारणे हा आयोग शोधणार आहे. हिंसाचार, दंगलीला आळा घालण्यात संबंधित यंत्रणा, व्यक्ती यांच्याकडून काही हयगय झाली काय, किंवा पुरेशा प्रशासकीय उपाययोजना करण्यात आल्या होत्या काय, याची तपासणी आयोग करणार आहे. या आयोगापुढे संघटना किंवा व्यक्ती आपले म्हणणे, तक्रारी मांडू शकतात. त्याची चौकशीही आयोगाकडून केली जाईल. या आयोगाच्या पहिल्या बैठकीनंतर सहा महिन्यांच्या आत आयोगाने आपला अहवाल केंद्र सरकारला देणे अपेक्षित आहे. त्याआधी आयोग अंतरिम अहवाल देऊ शकेल.

## चित्रपटसृष्टीवर मायेची पाखर घालणारी 'आई' हरपली : मुख्यमंत्री



मुंबई : पडद्यावर आणि पडद्याच्या मागेही चित्रपटसृष्टीवर मायेची पाखर घालणारी 'आई' ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना लाटकर यांच्या निधनामुळे काळाने आपल्यातून ओढून नेली आहे. मराठीसह, हिंदी चित्रपट सृष्टीने एक लोभस, सहज अभिनयाने अनेकांच्या मनमनात घर केलेली एक महान अभिनेत्री आपण गमावली आहे, अशा शोकमग्न भावना करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रख्यात अभिनेत्री पद्मश्री, महाराष्ट्र भूषण सुलोचना दीदी यांना निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. शोकसंदेशात मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले आहे की, सुलोचना दीदींनी मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. त्यांनी आपल्या व्यक्तिरेखांनी विशेषत: 'आई'च्या भूमिकेने प्रेक्षकांच्या मनात । पान २ वर

## सरकार कोणाचाच बचाव करत नाहीये...

### अखेर कुस्तीपटूंच्या आंदोलनावर क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी सोडलं मौन



मुंबई : भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष आणि भाजप खासदार बृजभूषण शरण सिंह यांच्या अटकेची मागणी करत गेल्या अनेक दिवसांपासून कुस्तीपटूंनी आंदोलन छेडलं आहे.गेल्या दीड महिन्यांपासून कुस्तीपटू सरकारकडे बृजभूषण शरण सिंह यांच्यावर करण्यात आलेल्या कारवाईची मागणी सातत्यानं करत आहेत. यावर मात्र भाजप सरकार मूग गिळून गप्प बसल्याची आणि बृजभूषण यांना पाठीशी घालत असल्याचे आरोप सातत्यानं होत आहेत. अशातच आता याप्रकरणी क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी मौन सोडलं आहे. सरकारचीही आंदोलक कुस्तीपटूंना न्याय मिळावा अशीच इच्छा आहे, असं ते म्हणाले. भाजप सरकारचा उल्लेख करत अनुराग ठाकूर कुस्तीपटूंच्या आरोपांबाबत बोलताना म्हणाले की, आम्ही खेळ आणि खेळाडूंना पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहोत आणि करत राहू.

केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी कुस्तीपटूंसोबतच्या बैठकीचाही उल्लेख केला. ते म्हणाले की, कुस्तीपटूंनी भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष आणि भाजप खासदार बृजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक शोषण केल्याबाबतच्या ७ वर्षांपूर्वीच्या तक्रारीबाबत सांगितलं. तसेच, यावेळी कुस्तीपटूंकडून वारंवार केल्या जाणाऱ्या बृजभूषण शरण सिंह यांच्या अटकेच्या मागणीसंदर्भातही अनुराग ठाकूर यांनी भाष्य केलं आहे. ते म्हणाले की, आम्ही (भाजप सरकार) कोणाचाच बचाव करत नाही आणि ना कोणालाही वाचवण्याचा प्रयत्न करत आहे. भारत सरकारचीही याप्रकरणी निष्पक्ष चौकशी व्हावी अशीच इच्छा आहे आणि यावर आम्ही ठाम आहोत. अनुराग ठाकूर यांनी सांगितलं की, त्यांनी आपले सर्व दौरे सोडले आणि कुस्तीपटूंशी संवाद साधला. सलग दोन दिवस चर्चा सुरू राहिल्या. यादरम्यान, खेळाडूंनी त्यांना ७ वर्ष जुन्या तक्रारीवर कारवाई करण्याचे आवाहन केलं. कुस्तीपटूंशी बोलूनच आम्ही समिती स्थापन केल्याचं ठाकूर म्हणाले. समितीनं या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी केली आहे.

## योग्य चौकशीद्वारे सत्य जगासमोर आणावे : ममता बॅनर्जी




कोलकाता : ओदिशाच्या बालासोर येथे झालेला भीषण रेल्वे अपघात हा या शतकातील सर्वात मोठा रेल्वे अपघात असल्याचा दावा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शनिवारी केला. या अपघातामागील सत्य बाहेर येण्यासाठी योग्य तपासाची गरजही त्यांनी व्यक्त केली. दोन वेळा रेल्वेमंत्रिपद भूषवणाऱ्या ममता यांनी घटनास्थळी भेट दिली व मदतकार्याची पाहणी केली. शनिवारी दुपारी त्या अपघातस्थळी पोहोचल्या. यावेळी त्यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. ममता यांनी सांगितले, की जर हा या शतकातील सर्वात भीषण रेल्वे अपघात असेल तर त्याचा योग्य तऱ्हेने तपास होण्याची आवश्यकता आहे. या दुर्घटनेमागे नक्कीच काही तरी चुकीचे घडले आहे. त्यामागील सत्य जगासमोर आले पाहिजे. रेल्वेगाड्यांची धडक रोखणारी यंत्रणा काम का करू शकली नाही, याचे कारण शोधले पाहिजे. या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या पश्चिम बंगालमधील नागरिकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाखांची मदत देण्याची घोषणाही ममता यांनी यावेळी केली. त्यांनी रेल्वे आणि ओदिशा सरकारलाही अपघातग्रस्तांना पुरेशी मदत देण्याचे आवाहन केले. पश्चिम बंगाल सरकारने ७० रुग्णवाहिका, ४० वैद्यकीय तज्ज्ञ आणि परिचारिकांचे पथक पाठवले असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

# पत्रकार कक्ष उपलब्ध करून देऊ जि.प.सीईओ दिलीप स्वामी यांचे आश्वासन




अक्कलकोट/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांना अक्कलकोट पंचायत समिती कार्यालयात पत्रकारांसाठी स्वतंत्र पत्रकार कक्ष उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की,बांधकाम विभागाच्या अधिकारी यांच्याशी जागे संदर्भात विचारपूस करून काही दिवसात पत्रकारांना पंचायत समितीच्या शासकीय कार्यालयात पत्रकार कक्ष उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.यावेळी गट विकास अधिकारी सचिन खुडे,महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष राजेंद्र विष्णुपंत कोरके पाटील,पत्रकार संघाचे अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे,सचिव विश्वनाथ चव्हाण,ज्येष्ठ पत्रकार राजेश जगताप,ज्येष्ठ पत्रकार महेश गायकवाड,जेष्ठ पत्रकार समाधान अहिरे,पत्रकार गौतम बाळशंकर,जेष्ठ पत्रकार चेतन जाधव,पत्रकार बसवराज बिराजदार,पत्रकार लिंगप्पा निंबाळ,अनुसूचित जातीचे तालुकाध्यक्ष निजप्पा गायकवाड, दत्ता कांबळे, इरण्णा धसाडे आदी उपस्थित होते.

# गर्जना समतेची काव्यसंग्रह महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रातील एक नवा प्रयोग: डॉ.श्रीपाल सबनीस




कल्याण/ठाणे : गर्जना समतेची ' या कविता संग्रहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान या दोन विषयांवर विविध जाती धर्माच्या कवींनी लिहिलेल्या कविता आहेत. परिवर्तनाची नांदी येथे दिसते. संविधान संस्कृती निर्माण करण्याच्या दृष्टीने हा काव्यसंग्रह अत्यंत महत्त्वाचा आहे. सृष्टी गुजराथी या सवर्ण कवयित्रिने 'मी आंबेडकरवादी' सारखी अप्रतिम कविता या संग्रहात लिहिली हे या कविता संग्रहाचे यश आहे. आजच्या अंधारलेल्या वातावरणाला प्रकाशाची मशाल दाखविण्याची ताकद या कविता संग्रहात आहे. महाराष्ट्राचे सांस्कृतिक चित्र बदलण्यासाठी 'गर्जना समतेची ' हा नवा प्रयोग मला महत्त्वाचा वाटतो. असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. अध्यक्षस्थानी जेष्ठ मराठी हिंदी साहित्यिक प्रा. दामोदर मोरे हे होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ अध्यासन बदलापूर आणि नीलपुष्प साहित्य मंडळाच्या वतीने हा कार्यक्रम कल्याण येथे आयोजित करण्यात आला होता.

गर्जना समतेची ( संपादक नंदादा कोकाटे, राजेश साबळे ), माणुसकी जपताना ( राजेश साबळे ) आणि समर्पण ( सुहासिनी भालेराव) या तीन पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. नीलपुष्प साहित्य मंडळाच्या कवींच्या या तीनही पुस्तकांतील सौंदर्यस्थळे त्यांनी उलगडून दाखविली. या प्रसंगी बोलतांना प्रा.दामोदर मोरे म्हणाले की,'माणुसकी जपताना 'कथासंग्रहात कुटुंबातील नातेसंबंधातील कलहाचे भावपूर्ण दर्शन घडते तर समर्पण कविता संग्रहात सहजता , स्वाभाविकता आणि समर्पण हा मूल्यभाव प्रकट झाला आहे. गर्जना समतेची या कविता संग्रहातील कविता मध्ये आंबेडकरवादाची काही मौलिक सूत्रे सहजपणे प्रकट झालेली आहेत. संविधानिक मूल्यांमुळे सर्वसामान्यांचं आणि आमचंही जगणं सुखकर, सुंदर आणि सुगंधी झाल्याची भावना या कविता संग्रहात प्रकट झाली आहे. लोकशाहीच्या सशक्तीकरणासाठी लेखक कवींनी संविधानिक मूल्यांची पेरणी आपल्या साहित्यातून वाचकांच्या मनोभूमीत करणे ही काळाची गरज आहे. या प्रसंगी शिवाजी गावडे, नीलम भोसले यांचीही भाषणे झाली. कीर्ती खांडे हीने सुरेल आवाजात स्वागत गीत प्रस्तुत केले.नीलपुष्प मंडळाचे संस्थापक नारायण तांबे यांच्या जन्मदिनी आणि नीलपुष्प साहित्य मंडळाच्या वर्धापन दिनी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी संविधानाची पूजा करुन मंडळाचे अध्यक्ष राजेश साबळे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमास ॲड.प्रज्ञेश सोनवणे, कवी नवनाथ रणखांबे, इजि . गौतम बस्ते, प्रा.दीपक गवई, वसईकर असे अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन प्रा.अनिल कवठेकर यांनी केले.

# भीमजयंती साजरी केला म्हणून या बौद्ध तरुणाची हत्या करणाऱ्या जातीवादी मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या : सैदप्पा झळकी



अक्कलकोट/प्रतिनिधी : नांदेड मधील बोनडार गावात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी केला म्हणून निर्दोष भीमसैनिक अक्षय भालेराव यांची निर्घृण हत्या होते हे भारतीय बौध्दांची शोकांतिका आहे. या हत्या करणाऱ्या जातीवादी मानसिकतेच्या निर्दयी आरोपींना कठोरात कठोर फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी रिपब्लीकन पक्षा(आठवले गट)चे जिल्हा चिटणीस सैदप्पा झळकी यांनी केली आहे. नांदेड मधील बोनडार गावातील युवक भीमसैनिक अक्षय भालेराव यांच्या गावात भारतीय घटनेचा शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनेक वर्षापासून बंद असलेल्या जयंती साजरी केला म्हणून हत्येचा आणि बोनडार गावातील दलित वस्तीवर झालेल्या हल्ल्याचा रिपब्लिकन पक्षातर्फे आपण तीव्र निषेध करीत असल्याचे सैदप्पा झळकी यांनी म्हंटले आहे. फुले शाहू आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी केली म्हणून एका बौद्ध तरुणाची निर्घृण हत्या केली जाते ही निंदनीय आणि महाराष्ट्राला काळिमा फासणारी घटना आहे. या अमानुष घटनेचा आम्ही तीव्र निषेध करतो असे या वेळी बोलतांना झळकी यांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केली आहेत.

दिवंगत अक्षय भालेराव यांच्या मारेकऱ्यांपैकी ७ जणांना अटक झाली असून उर्वरित आरोपींना तात्काळ अटक करावी. आरोपींना कठोर शिक्षा होण्यासाठी हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा. दिवंगत अक्षय भालेराव यांच्या कुटुंबाला शासनाने आर्थिक मदत तात्काळ द्यावी. त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय नोकरी देऊन कुटुंबाचे पूनर्वसन करावे आणी उर्वरीत बौध्द कुटुंबालाही संरक्षण द्यावे.अक्षय भालेराव खून प्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर फाशीची शिक्षा द्यावी जेणे करून पुन्हा असा गुन्हा कोणी करू नये असा कायद्याचा धाक निर्माण होईल अशी वक्तव्यही सैदप्पा झळकी यांनी व्यक्त केली आहे.

# कुरनूर धरणात फक्त १६ टक्के जलसाठा शिल्लक

अक्कलकोट/प्रतिनिधीः कुरनूर धरणात फक्त १६ टक्के जलसाठा शिल्लक, अद्याप ही पाऊस नसल्याने धरणावर अवलंबून असलेल्या गावांना व शेतकर्यांना चिंता लागून राहिली आहे.

श्री क्षेत्र अक्कलकोट शहरासह मैंदर्गी, दुधनी या तिन्हीही नगर परिषदेचा पाणी पुरवठा हा कुरनूर धरणावर अवलंबून असून वर्षातून दोन वेळा पाणी उन्हाळी हंगाम व रब्बी हंगामासाठी सोडले जाते. नुकतेच उन्हाळी हंगामासाठी पाणी सोडण्यात आले, सतत वाढत गेलेले तापमान त्यातून पाण्याची घट होऊन फक्त १६ टक्के पाणी साठा शिल्लक असल्याने पाण्याचा विषय हा पावसाच्या विलंबाने बिकट होण्याची शक्यता नाकारता येत नाही,

सदरचे धरण हे तुळजापूरच्या भागात पडणार्या पावसावर अवलंबून असून अद्याप ही उजनीच्या पाण्याच्या प्रतिक्षेत आहे.पाऊस लांबला तर सदरचे धरण हे कोरडे ठाक होणार आहे,

पावसावर अवलंबून असणारी स्थिती फक्त १६ टक्के जलसाठ्याने छोट्या तलावाची परिस्थिती होतान दिसत आहे.

# वागदरी येथे सत्यशील सामाजिक संस्थेच्या वतीने इ.दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार



वागदरी/ एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील वागदरी येते सत्यशील सामाजिक संस्था पुणे (वागदरी) च्या वतीने इ.१०वी आणि १२ वी बोर्ड परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा शालेय साहित्य देवून सत्कार करण्यात आला. येथील पंचशील बुद्ध विहाराच्या प्रांगणात सत्यशील सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्रषी उत्पन्न बाजार समिती तुळजापूर चे नुतन संचालक अँड. रामचंद्र ढवळे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारूती बनसोडे, सहशिक्षक सिद्राम साखरे,सुरेश कोकरे,सिताराम जाधव उपस्थित होते. प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरयांच्या प्रतिमांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुजन करून सामुदायिकरित्या बुद्ध वंदना घेण्यात आली. याप्रसंगी क्रषी उत्पन्न बाजार समिती तुळजापूर च्या संचालक पदी निवड झाल्या बदल अँड.रामचंद्र ढवळे यांचा सत्कार करून इ.१० वी आणि १२ वी बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा शालेय साहित्य देवून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन रिपाइं (आठवले)जिल्हा समन्वयक तथा पत्रकार एस.के.गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन महादेव


# अक्कलकोट शहराकरिता 'अमृत' पाणी पुरवठा योजना राबवावी

अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री क्षेत्र अक्कलकोटची वाढती लोकसंख्या पाहता यासह श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी तरंगती लोक संख्या या दोन्ही च्या अनुषंगाने एक नवीन पाणी पुरवठा योजना 'अमृत' या योजनेतून घेण्याची मागणी पुढे येत आहे. अक्कलकोट शहराला पाणी पुरवठा करणार्या चार योजना आहेत,

यामध्ये सांगवी, कुरनूर, हालचिंचोळी, हिळ्ळी या पैकी काही योजना असताना ही केवळ पावसावर अवलंबून असल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गेल्या तीन दशकापासून मिटायला तयार नाही. शाश्वत पाणीपुरवठा योजना कोणतीच नसल्याने ८ ते १५-२५ दिवसासह महिन्यापर्यंत शहराला पाणी पुरवठा झाले आहे.

ही परिस्थिती बदलण्याकामी नुकतेच झालेल्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात ३६८ कोटी पैकी ४० कोटी निधी पाणी पुरवठ्या खर्च होणार आहे. हे तर काम व्हायलाच पाहिजे, यासह शहरात करिता 'अमृत' योजनेच्या माध्यमातून आणखिन एक योजना आखावी असे नागरिकातून बोलले जात आहे.

## शब्दकोडे क्र १९



आडवे शब्द २. दोन सागरांना जोडणारा चिंचोळा प्रवाह ५. उत्पत्ती, जन्म ८. युधिष्ठिर १०. राजकारणी डावपेच ११. अपयश घेऊन माघारी येणे १३. वर्ष १५. दरवाजा १६. निकड १७. दोन्ही १९. वानराची जात २१. अवैध मार्गाने येणाऱ्या लक्ष्मीचे वाहन २५. कार्यक्रम २७. कमी होणे २८. खळबळजनक २९. संन्याशी ३१. पशूप्रमाणे ३३. चिन्ह ३५. चिंता ३६. उसाचा रस काढण्याचे पारंपरिक साधन ३८. टिंगल ३९. बँड बरोबर वाजवण्याचे वाद्य? ४०. लेखनपद्धती ४२. निर्णय, तड ४४. बरोबरी, माळ ४५. धाक ४७. उन्हाळ्यातला त्रास ४८. मदत ५०. माता ५२. अग्नी ५४. अरण्य ५५. खिळा (संस्कृत) ५७. 'भेटीलागी जीवा, लागलीसे आस...' ५९. प्रहर ६१. वस्त्र ६३. मृत्तिका ६४. लोणच्यातील असल्यास चटकदार ६५. छिद्र ६६. काळवीट याचाच प्रकार ६८. '-- आज माझी नसे साथ द्याया' ६९. तणाव ७०. आप्त ७१. पती व पत्नीची आई ७२. पुष्कळ ७३. अनाठायी खचर ७५. भूकंप ७७. सरकारी अधिकारी ८०. जाड भाकरी ८३. खात्री ८४. उदासी, मनाची मरगळ ८६. सुखरूप ८९. इसम ९१. धान्य पिकवणारी जमीन ९३. नाजूक ९४. डोळ्याच्या उघड्या भागावरील गोलाकार पारदर्शक आवरण ९५. नवीन ९६. नामांकित ९९. चामखीळ १००. मजकुराच्या तळाशी दिलेला संक्षिप्त खुलासा किंवा टीप १०१. विनयी १०२. मूर्खपणे सादर केलेले मत-विचार १०३. सीता

उभे शब्द १. शेकडा प्रमाण २. अनुरूप ३. धन ४. धुके ५. विष ६. दमयंतीचा पती ७. नूतन ८. कोथिंबिरीच्या बिया ९. गाढव १२. पोटाला लागलेली रग १४. लहान १५. खट्याळ १७. पाणी व जमीन दोन्हीकडे राहू शकणारा १८. सातू १९. तरट २०. प्रेमात पाडणारे, मोहक २२. पदोन्नती २३. मौनव्रत धारण केलेला २४. करंगळीजवळचे बोट २६. पिछेहाट ३०. किनारा ३२. सहापैकी थंडीत येणारा ऋतू ३३. जनता ३४. कळी ३७. मिळकत ३९. डझन ४१. त्रास ४२. आकाशाचा रंग ४३. छोटा ४४. कापसाचे बी ४६. ओळखीची व्यक्ती भेटल्यावर अभिवादनाचे खास मराठमोळे शब्द ४७. पूर्व दिशा ४९. कन्या ५०. द्वेष ५१. विड्यातील एक घटक ५२. पार्वती ५३. पायताण ५४. आसाममधील प्रसिद्ध अभयारण्य ५६. क्षार, मीठ ५८. स्तुती ६०. शासनाचे उत्पन्न ६२. अकबराच्या दरबारची खासियत ६७. ज्वर ६८. लाडका ६९. धातूचा तंतू, धुंदी ७०. मचूळ ७१. शांतता ७३. अविरत ७४. वेदना ७६. निर्धन ७८. पत्नी ७९. व्यवसाय ८१. बंगाली मिठाईचा प्रकार ८२. भरधाव ८४. शेतीचे पारंपरिक औजार ८५. चंद्रदर्शन होणारी अमावस्या ८७. तांबडा ८८. शोध ८९. उपमर्द ९०. प्रिय व्यक्तींची भेट ९१. अखेरीस ९२. हे बाळले की सुंठ बनते ९५. पाण्याची तोटी ९७. लोक ९८. लाह्या, वैदिक लग्नातील एक विधी- -- होम ९९. पुष्परस

# वारकरी, भाविकांना उष्माघाताचा त्रास होऊ नये यासाठी दक्षता घ्यावी : प्र. जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे



पंढरपूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्ह्यात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे आगमन २३ जून तर जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे आगमन २४ जून २०२३ रोजी असून, अन्य संतांच्या पालखी सोहळ्यासोबत आषाढी वारीसाठी मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. दरवर्षीपेक्षा पालखी सोहळ्यांचे प्रस्थान अगोदर होत असल्याने उन्हाळ्याचा त्रास वारकरी भाविकांना होऊ नये यासाठी आवश्यकती दक्षता घेवून पालखी तळावर व मार्गावर मुबलक पाणी पुरवठा व पुरेसा औषध साठा उपलब्ध ठेवावा अशा सूचना प्र. जिल्हाधिकारी तुषार ठोबरे यांनी दिल्या. आषाढीवारी पुर्वनियोजनाबाबत शासकीय विश्रामगृह पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस प्रांताधिकारी गजानन गुरव, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले,पोलीस निरिक्षक मिलींद पाटील, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसन्न भातलवंडे, तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्र. जिल्हाधिकारी ठोंबरे म्हणाले, वारकरी भाविकांना पालखी तळांवर, मार्गावर शुध्द व मुबलक पाणी पुरवठा व्हावा यासाठी निश्चित करण्यात आलेल्या पाण्याच्या स्त्रोतांची व पाण्याची वेळोवेळी तपासणी करण्यात यावी.तसेच भाविकांना पाणी मुबलक प्रमाणात मिळेल यादृष्टीने आवश्यक ते नियोजन करावे. आरोग्य विभागाने ओआरएस बरोबर पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवावा. गर्दीच्या ठिकाणी तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी दुचाकीवरुन सेवा देण्यासाठी आरोग्य दूत सुसज्ज ठेवावेत. पालखी तळावर देण्यात आलेल्या सुविधांमध्ये पाणी व्यवस्था, आरोग्य सुविधा, आपत्कालिन कक्ष, शौचालय, अग्नीशमन व्यवस्था आदीबाबतचे माहिती फलक लावावेत. नगरपालिकेने यात्रा कालावधीत स्थानिक लोकसंख्या तसेच येणाऱ्या भाविकांची संख्या विचारात घेवून मुबलक प्रमाणात पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी. तसेच शहरातील नगरपालिकेच्या बोअरवेलसह खाजगी बोअरवेलव्दारे पाणीपुरवठा करावा तसेचनदी पात्र, ६५ एकर, मंदीर परिसर येथील वेळोवळी स्वच्छता करावी अशा सूचनाही प्र. जिल्हाधिकारी ठोबरे यांनी दिल्या.त्याचबरोबर हरीत वारी आणि निर्मल वारीसाठी सर्वांनी सहभाग घ्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी पालखी तळांवर व मार्गावर वारकरी भाविकांसाठी करण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती दिली. तर ६५ एकर, नदी पात्र तसेच शहरात नगरपालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती यावेळी मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी दिली.

# आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते कारहूनवी निमित्त बैल जोडीची पूजन

## जय भारत माता सेवा समिती संस्थापक अध्यक्ष सदगुरु हवा मल्लिनाथ महाराज उपस्थित साजरा झाला कारहूनवी



अक्कलकोट/प्रतिनिधी : तालुक्यातील श्रीक्षेत्र श्रीमंतलिंग पत्रीबन मल्लिनाथ देवस्थान किणी येथे जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली चे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सदगुरु हवा मल्लिनाथ महाराज आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते कारहूनवी निमित्त बैल जोडीची पूजन करण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांनी श्री बसवेश्वर महाराज की जय जय चा जयघोष करीत जल्लोष साजरा केला.

यावेळी आमदार कल्याणशेट्टी यांनी किणी आणि सुलतानपूर मधील पुलांचे भूमिपूजन कार्यक्रमास सदगुरु हवा मल्लिनाथ महाराजांना येण्याचे आमंत्रण दिले.आणि महाराज कधी वेळ देईल त्यावेळी सदर पुलांचे भूमिपूजन कार्यक्रम करणार असल्याचे सांगितले. तसेच श्रीक्षेत्र पत्रिबन मल्लिनाथ देवस्थानास संरक्षण भिंत बांधणे साठी १० लाख रुपये निधी देण्याची घोषणा केले. या व्यतिरिक्त अजून निधीची गरज पडल्यास तेही देवू आणि आम्ही सारे मिळून या देवस्थानाची विकास करण्याचे प्रयत्न करू अशी ग्वाही आमदार कल्याणशेट्टी यांनी यावेळी दिली. यावेळी किणीचे उपसरपंच अमोल हिप्परगी, कुरनुंचे सरपंच व्यंकटेश मोरे, बसवराज बिराजदार पत्रकार,दिलीप मोरे, भीमाशंकर तुळजापूरे विस्तार अधिकारी, नेमिनाथ आगरखेड,सुरेश कल्लशेटी, चंद्रकांत गुरव ग्रामसेवक,आप्पशा कोठमाळे,तेजू बिराजदार,बाबा पाटील सह हन्नुर, चुंगी, सुलतानपूर, कीणी भागातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यपालांच्या उपस्थितीत अश्वमेध महायज्ञासाठी भूमिपूजन संपन्न




मुंबई : खारघर येथे २३ ते २८ जानेवारी २०२४ या कालावधीत होणाऱ्या ४८ व्या अश्वमेध महायज्ञानिमित्त भूमीपूजनाचा कार्यक्रम राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत मध्यवर्ती मैदान, खारघर येथे संपन्न झाला. अखिल विश्व गायत्री परिवार शांतिकुंज हरिद्वार या संस्थेतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

अश्वमेध यज्ञ हे केवळ धार्मिक अनुष्ठान नाही, तर त्याचे सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण विषयक व अध्यात्मिक महत्त्व आहे. सर्व समाजाला एकत्र घेऊन यज्ञ करीत असल्यामुळे त्यातून मतभेद मिटून एकात्मतेची भावना वाढते, असे राज्यपालांनी सांगितले.आज पर्यावरण आणि सामाजिक ऐक्याला धक्का लावणाऱ्या घटना घडत आहेत. अश्यावेळी अश्वमेध यज्ञाच्या माध्यमातून समष्टी, सद्भावना व मांगल्याची पुनर्स्थापना होण्याला मदत होईल, असे राज्यपालांनी सांगितले.जागतिक हवामान बदलांचे परिणाम तीव्र होत असून अलिकडच्या काळात राज्याने वारंवार दुष्काळ व पूरस्थिती अनुभवली आहे असे सांगून पर्यावरण व विकास यामध्ये यांचा समतोल साधण्याची आवश्यकता आहे, असे राज्यपालांनी सांगितले.विश्वकल्याणाच्या उद्देशाने अश्वमेध महायज्ञाचे आयोजन केल्याबद्दल राज्यपालांनी अखिल विश्व गायत्री परिवाराचे अभिनंदन केले.यावेळी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, देव संस्कृती विश्व विद्यालयाचे प्र-कुलगुरू चिन्मय पंड्या, अखिल विश्व गायत्री परिवाराचे संचालक मनुभाई पटेल, उद्योजक डॉ निरंजन हिरानंदानी, राधिका मर्चंट तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# 'ग्लोबल वॉर्मिंग' विरुद्ध लढण्यासाठी पर्यावरण संवर्धन व्हावे : वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आवाहन

मुंबई : भारत आणि युरोपीय देशातील सांस्कृतिक संबंध, व्यापार-उद्योगाला प्रोत्साहन देत असतानाच इन्वेन्शन आणि इनोवेशन चा प्राधान्याने विचार करावा व वसुंधरेच्या रक्षणासाठी पर्यावरण संवर्धनाचे कार्य वाढावे; यासाठी महाराष्ट्र सतत सोबत राहील, दोन्ही देशांत व्यापार वाढावा पण प्रेम व स्नेह देखील घट्ट व्हावा, अशी अपेक्षा वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.द कौन्सिल ऑफ युरोपीयन चेंबर इन इंडिया च्या वतीने मुंबईतील ताज हॉटेल येथे आयोजित युरोपियन डे समारंभात ते बोलत होते. मंचावर मध्य प्रदेशचे सूक्ष्म, मध्यम व लघु उद्योग तथा विज्ञान व तंत्र विज्ञान मंत्री श्री ओमप्रकाश सकलेचा, स्वीडन च्या कौन्सिल जनरल ना लेकवॉल, द कौन्सिल ऑफ युरोपीयन चेंबर इन इंडियाच्या डायरेक्टर डॉ. रेणू शोम, अध्यक्ष पियुष कौशिक, उपाध्यक्ष राजीव शर्मा उपस्थित होते.

मंत्री श्री. मुनगंटीवार पुढे म्हणाले की, भारत आणि युरोपीय देशांचे संबंध व्यापारिक आणि आर्थिक क्षेत्रात अधिक दृढ व्हायला हवे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत जागतिक स्तरावर प्रगती करीत आहे. वसुधैव कुटुंबकम ही भावना आणि हे विचार जगात पोहोचावे यासाठी मोदीजींनी पुढाकार घेतला आहे. जय जवान, जय किसान, जय विज्ञान च्या पुढे जय अनुसंधान चा नारा देत नवीनतम आणि संशोधन (इनोवेशन आणि इन्वेन्शन) याकडे आता भारत लक्ष देत आहे. आपणही यासाठी पुढे यावे; फक्त संशोधन करताना नव्या समस्या निर्माण होऊ नयेत याची काळजी घेतली पाहिजे असेही ते म्हणाले.जागतिक पर्यावरण बदलाचा प्रश्न संपूर्ण जगाला सतावत असून पर्यावरण व वन संरक्षण ही आपण आपली जबाबदारी समजून ग्लोबल वॉर्मिंग नावाच्या दानवाचा संहार करु, अशी भावना मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

भारतात गुंतवणूक करण्याचे आवाहन उपस्थितांना करून मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, तुम्ही विविध क्षेत्रात गुंतवणूक करण्यास पुढे या. महाराष्ट्र स्वागताला तयार आहे, यावेळी त्यांनी उपस्थित सर्व देशांच्या अधिकाऱ्यांना व उद्योगपतींना ताडोबा व्याघ्र सफारीला येण्याचे निमंत्रण देखील दिले. मध्य प्रदेशचे मंत्री श्री ओमप्रकाश सकलेचा यांनी भारत आणि युरोपीय देशांनी आपल्या गरजा ओळखून शैक्षणिक, औद्योगिक आणि विशेष करुन तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात देवाण घेवाण करावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

# दुधनी केंद्रात व परमशेट्टी प्रशालेत भाग्यश्री बाहेरमठ प्रथम



अक्कलकोट/प्रतिनिधी: श्री शांत लिंगेश्वर शिक्षण प्रसारक संस्था हिरेजेवरगी दुधनी संचलित श्री एस जी परमशेट्टी हायस्कूल चा दहावी बोर्ड परिक्षेचा निकाल ९८.२३ टक्के लागला असून यात प्रशालेत व केंद्रात भाग्यश्री शांतलिंग बाहेरमठ हिने ९५.४०% गुण मिळेवून प्रथम क्रमांक पटकावले तर निकिता शिवयोगी ठक्का हिने ९४.६०% गुण मिळवून केंद्रात व प्रशालेत द्वितीय क्रमांक पटकाविले तसेल वर्षा शिवाजी बंडगर हिने ९३.६०% गुण मिळवत प्रशालेत व केंद्रात तृतीय क्रमांक पटकावले या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष परमपूज्य ष ब्र . श्री जयगुरुशांत लिगाराध्य उपाध्यक्ष महांतेश देसाई माजी मंत्री व संस्थेचे सदस्य सिद्धाराम म्हेत्रे संस्थेचे सदस्य सातलिंगप्पा परमशेट्टी राजशेकर गाडी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राखी खंडाळ उपाध्यक्ष सावित्री पुजारी व तज्ञ मार्गदर्शक सुभाष परमशेट्टी प्रशालाचे मुख्याध्यापक आर जी आलिगावे पर्यवेक्षक लक्ष्मीपुत्र गद्दी यांनी अभिनंदन केले

# स्वच्छ, सुंदर व निरोगी शहर बनविण्यासाठी निसर्ग फौंडेशनची स्थापना : विद्याधर गुरव



अक्कलकोट/प्रतिनिधी : स्वच्छ, सुंदर व निरोगी शहर बनविण्यासाठी निसर्ग फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुनिल बिराजदार यांनी निसर्ग फॉउंडेशनची स्थापना केली असल्याचे गौरव उद्गार विद्याधर गुरव यांनी काढले. ते महाराष्ट्र राज्य परिवहन मार्ग महामंडळाच्या अमृतमोत्सवी वर्षाचे औचित्य साधून अक्कलकोट आगार व निसर्ग फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बसस्थानक परिसरात स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यधर गुरव हे बोलत होते.यावेळी निसर्ग फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुनिल बिराजदार, विद्याधर गुरव, एस.टी. महामंडळाचे एस.एम.कांबळे, एस.एम. कोप्पा, पी.व्ही पडतरे, अभिजीत लोके, निलकंठ कापसे, प्रमोद लोकापुरे, सिध्दाराम मोघे, विजय धरणे, तात्या समाणे, विश्वनाथ देवरमणी आदी प्रमुख उपस्थिती होते.

यापुढे बोलताना म्हळाले की, या फौंडेशनचे कार्य पाहून शेकडो समाजसेवकांनी तन-मन-धनानी एक स्वच्छता दूत म्हणून हिरिरिने काम करित असतात. हे वाकाजोखने सारखे असून काही वर्षभरात फौंडेशनने शहर स्वच्छते बरोबरच वृक्ष लागवड, संगोपन, स्मशानभूमी स्वच्छता, रंगोटी आदी कामे केलेले असून भविष्य काळात शहरात विविध ठिकाणी मुख्या जनावरांना पाण्याचे हौद व निराश्रीत नागरिकांचा मयत झाला असेल तर अंतविधीचा खर्च फौंडेशनच्या वतीने केला जाणार असल्याचे सांगत होते.या प्रसंगी स्वच्छता दूत सिध्दाराम मोघे, रामलिंग शेरीकर, प्रवीण पडसलगी, विशाल पसारे, शंकर अलोणे, प्रभाकर घिवारे, चन्नू शिंगे, तम्मा शेळके, सुरेश हिरापुरे, प्रभू शाबादे, शिवाजी चौगुले, सुरेश पाटील, शरणू मुदगोंडा, आनंद विभुते, भजे, वैरागकर, शिवानंद कारले, सुरज आळंद आदी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्वच्छ शहर, सुंदर शहर बनविण्याच्या हेतूने अक्कलकोट बसस्थानक परिसर स्वच्छ करण्यात आले.

# काझीकणबस येथे भीमशक्ती तरूण मंडळातर्फे एस एस.सी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार



अक्कलकोट/प्रतिनिधी : काझीकणबस मध्ये भीमशक्ती तरूण मंडळातर्फे एस एस.सी परीक्षेत उज्वल यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा शानदारपणे सत्कार सोहळा संपन्न . काझीकणबस एस.एस.सी परीक्षेत उज्वल यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा अभुतपूर्व सत्कार करण्यात आला सदरच्या कार्यक़्रमाचे अध्यक्ष म्हणून लोकप्रिय सरपंच मा सिध्दाराम धर्मसाले होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. सागर सोनकांबळे उपस्थितीत होते. या कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थितीत म्हणून पी आर पीचे रत्नाकर गायकवाड आर.पीआयचे सोपान गायकवाड भारतीय लष्करातील जवान आदरणीय संतराम गायकवाड अणि कर्तव्यदक्ष पोलीस पाटील आदरणीय दिपकजी मंठाळे श्री बसवेश्वर प्रशालेतील मुख्याध्यापक श्री शिवराज किलजे सर अणि फुले शाहू आंबेडकर हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री.जाधव सर माजी तंटा मुक्त अध्यक्ष अशोकजी मजगे अणि रा.स.पचे अध्यक्ष नारायण बंदीछोडे शेकु गायकवाड धर्मु गायकवाड इत्यादी उपस्थित होते. हे कार्यक़्रम यशस्वी करण्यासाठी अमृत कांबळे अणि सुरज गायकवाड हरिष गायकवाड यांनी अथक प्रयत्न करून जिद्दीने कार्यक़्रम यशस्वी केले.




# अक्कलकोट मध्ये गुरुवारी तहसील कार्यालयावर भव्य मूक मोर्चा

अक्कलकोट/प्रतिनिधी :नांदेड येथे जातिवाद्याकडून डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जयंती केली म्हणून अक्षय भालेराव यांची हत्या करण्यात आले

या विरोधात निषेध व्यक्त करत ,,अक्कलकोट शहरात तहसिलदार कार्यालयावर गुरुवारी भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे तालुक्यातील सर्व भीमसैनिक एकत्र येऊन सर्व पक्ष सर्व बहुजनवादी यांची तातडीची बैठक घेण्यात आले, मैंदर्गी रोडवरील भक्तनिवास येथे बैठक घेण्यात आले असून यात मोर्चाचे रूपरेषा ठरवण्यात आले यावेळी आंबेडकर विचारधारेचे बहुजन चळवळीतील अनेक मान्यवर उपस्थित होते यात सर्व राजकीय पक्ष सामाजिक संघटना नगरसेवक सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य त्याचबरोबर विविध क्षेत्रातील सामाजिक कार्य करणारे कार्यकर्ते सक्रिय सहभाग घेतले होते यावेळी तालुक्यातील व शहरातील सर्व भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रियेला सुरुवात

## स्वेरीच्या डिप्लोमा महाविद्यालयात सदर सुविधा उपलब्ध




पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित डिप्लोमा इंजिनिअरिंग मध्ये प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी फॅसिलिटेशन सेंटर (एफ.सी.) क्र.- ६४३७ ची मान्यता मिळाली असून गुरुवार ( दि.०१ जून २०२३) पासून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे, कागदपत्रे पडताळणी व अर्ज निश्चिती आदी प्रक्रिया सुरू झाली असून ही प्रक्रिया बुधवार दि. २१ जून २०२३ पर्यंत चालणार आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ यांनी दिली.

सन २०२३-२४ करीता डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, भरलेले अर्ज स्विकारुन प्रमाणपत्रे, कागदपत्रांची तपासणी, छाननी व नोंदणी आदी प्रक्रिया करण्याकरिता मुंबई येथील मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य (डी.टी.ई) यांचे अधिकृत केंद्र (एफ.सी.क्र.-६४३७) म्हणून स्वेरीच्या डिप्लोमा महाविद्यालयास मान्यता दिली आहे. पंढरपूर पंचक्रोशीतील व ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालक यांच्यासाठी प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या प्रवेश प्रक्रियेचे मार्गदर्शन, पालकांचा होणारा संभ्रम, संबंधीत कागदपत्रे जमविताना होणारी अडचण व शंका याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सुविधा केंद्र सुरु केले असून यंदाचे हे डिप्लोमा इंजिनिअरिंगचे १६ वे वर्ष आहे. स्वेरीच्या डिप्लोमा महाविद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. ही प्रकिया दि. ०१ जून २०२३ पासून ते दि. २१ जून २०२३ सायं. ५ वाजेपर्यंत चालणार आहे. याचा लाभ दहावी मधून उत्तीर्ण होणारे विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी घेण्याचे आवाहन केले आहे. या कालावधीत प्रमाणपत्रांची पडताळणी, छाननी व नोंदणी आदी प्रक्रियेनंतर मुख्य कॅप राऊंडसाठी ऑप्शन फॉर्म भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया चालू होणार आहे. डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी मोबा.क्र.प्रा.एस.एस.गायकवाड (९८९०५६६२८१), प्रा.एम.एम.मोरे (९४२१९६०२५८) यावर संपर्क साधण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ यांनी केले आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली डिप्लोमा इंजिनिअरिंग फॅसिलिटेशन सेंटरमध्ये सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे दिसून येत आहे.

# १५० वर्षांपासूनची परंपरा टाकळीवाडीतील सुनकल देवाचा आंबील खिचडा केला की पाऊस शंभर टक्के पडतो,अंधश्रद्धा नव्हे वस्तूतिथी आहे.



टाकळीवाडी/नामदेव निर्मळे : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे आसपास गावाशेजारी वळवाचा पाऊस पडत होता. परंतु टाकळीवाडी मध्ये पडत नव्हता. परंतु टाकळीवाडी मध्ये सुनकल या देवाची यात्रा केली की हमखास पाऊस पडतो ही प्रथा सुरू आहे. १५० वर्षापासून परंपरा चालू आहे. टाकळीवाडी येथे जागृत देवस्थान सुनकल या देवाला आंबील ,खिचडा ,नैवेद्य दाखवला की पाऊस हमखास पडतोच.गावामध्ये पाऊस पडत नसला की पूर्वी लोक या देवळाजवळ जाऊन पावसाला बसायचे. व पावसाला बसला की लगेच पाऊस पडत होता. ही प्रथा आज तागात सुरू आहे. ही अंधश्रद्धा नसून हकीकत आहे. आज पुजारी ज्ञानदेव आप्पासो भातमारे या देवळाचे पुजारी असून सकाळी देऊळ परिसराची स्वच्छता करून देवाला आंघोळ घालून चुना लावल्यात आला होता.व संध्याकाळी गावातील जागृत देवस्थान म्हसोबा देवाची पालखी ढोल वादन करून आणली जाते. सोबत आंबील खिचडा नैवेद्य म्हणून आणला जातो.देवाला दैवत दाखवताच गावामध्ये आज पाऊस वळवाचा जोराचा चालू झाला. नागरिकांची तारांबळ उडाली. ही हकीकत दीडशे वर्षे झाली चालू आहे.म्हसोबाची पालखी या देवळा भोवती दोन वेळा फिरवली जाते. ऊद ,कापूर व पूजा केली जाते. आज टाकळी वरती नागरिकांनी पावसाचा आनंद घेतला. हि सत्य परिस्थिती आहे. टाकळीवाडीकर हे १५० वर्षे झाले हा अनुभव घेत आहेत.